# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वे दिनाक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमाक ६) व्दारा सचालित राज्य विद्यापीठ)

## परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग

कॉम्पलेक्स परिसर, एम.आय.डी.सी. रोड, गडचिरोली - ४४२६०५

दुरध्वनी क्रमांक : कार्यालय : ०७१३२-२२३३२०
ईमल : coegondwana@gmail.com

जा. क्र. गों.वि/परीक्षावि./२०९७/२०२१ | दि. २३/०७/२०२१

## सुधारीत परीपत्रक

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील उन्हाळी -२०२१ च्या लेखी परीक्षेबाबत.**
**संदर्भ :-** १. मा. परीक्षा व मुल्यमापन मंडळाची झालेली सभा दि. ०९ जुलै २०२१

गोंडवाना विद्यापीठातील सलंग्नीत महाविद्यालयातील प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक व संबंधित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या शैक्षणिक सत्र २०२०-२१ मधील उन्हाळी २०२१ परीक्षेच्या लेखी परीक्षा दि. १० ऑगस्ट २०२१ पासुन संबंधीत अभ्यासक्रमाच्या वेळापत्रकानुसार Online MCQ (बहुपर्यायी प्रश्न) पध्दतीनूसार घेण्याचे ठरविण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने ऑनलॉईन लेखी परीक्षेबाबत खालील प्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात येत आहे.

### शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील उन्हाळी - २०२१ च्या लेखी Online MCQ परीक्षेबाबत मार्गदर्शक सुचना.

१. उन्हाळी २०२१ परीक्षेतील पदवी/पदव्युत्तर वर्गामधे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सदर परीक्षा घेण्यात येईल. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे बॅकलॉक विषय असतील अशा परीक्षा सुध्दा याचवेळी खालील पध्दतीने घेण्यात येतील.
२. सदर परीक्षा Online MCQ (बहुपर्यायी प्रश्न) पध्दतीने घेतल्या जातील.
३. सदर परीक्षा दि. १० ऑगस्ट २०२१ पासुन संबंधीत अभ्यासक्रमाच्या वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात येईल.
४. विद्यार्थ्यांना सदर प्रश्नपत्रिका सोडविण्याकरीता संबंधीत अभ्यासक्रमाच्या वेळापत्रकानुसार एकुण ७५ मिनीटांचा अवधी देण्यात येईल.
५. एकुण ५० बहुपर्यायी प्रश्न असतील व प्रत्येक प्रश्नाला १ गुण याप्रमाणे एकुण ५० गुणाचा पेपर असेल. चुक प्रश्नासाठी कोणतेही Negative Marking नसतील. सदर बहुपर्यायी परीक्षेतील प्राप्त गुण संबधीत अभ्यासक्रमाच्या परीक्षा योजनेनूसार परिवर्तीत करण्यात येईल.
६. विद्यार्थ्यांनी परीक्षेकरीता आपल्या महाविद्यालयामार्फत विद्यापीठाकाडे नोंदणी केलेला मोबाईल क्रमांक सोबत बाळगणे अनिवार्य आहे.
७. परीक्षेकरीता विद्यार्थ्यांना अॅन्ड्राईड मोबाईल फोन/लॅपटाप / डेस्कटॉप अथवा टॅबलेट इत्यादी चा वापर करावयाचा असून इंटरनेटची सुविधा आवश्यक आहे.
८. विद्यार्थ्यांना एका वेळी एकच प्रश्न दिसेल सदर प्रश्नाचे उत्तर देता अथवा न देता पुढे जाता येईल. मात्र असा प्रश्न विद्यार्थ्याने सोडविला असे गृहीत धरण्यात येईल. सदर प्रश्नाचे उत्तर बदलता येणार नाही. आधी सोडविलेले प्रश्न किंवा नंतरचे प्रश्न बघता येणार नाही
९. प्रश्नपत्रिका डाऊनलोड करता येणार नाही.

१०. विद्यार्थ्यांना कोणत्याही परीक्षा केंद्रावर न जाता स्वत:च्या सोईनुसार घराबाहेर न पडता परीक्षा देता येईल.

११. सदर परीक्षा विद्यापीठाच्या संबंधीत विषयाच्या १०० टक्के अभ्यासक्रमावर आधारीत असेल.

१२. विद्यार्थ्याने परीक्षेला सुरुवात केल्यावर विजप्रवाह खंडीत झाल्यास किवा नेटवर्क संबंधात काही अडचणी आल्यास किंवा अन्य तांत्रिक अडचणी आल्यास काही वेळानंतर सुध्दा विद्यार्थ्यांना विहीत आठ तासात परत Online login करता येईल. परत login केल्यावर विद्यार्थ्याला परीक्षा ज्या टप्प्यावर खंडीत झाली असेल तिथुन पुनश्चः पुढे जाता येईल.

१३. कोव्हीड - १९ या साथ रोगाच्या प्रादुर्भावामुळे वरील सर्व तरतुदी या फक्त उन्हाळी २०२१ परीक्षे साठीच असतील.

१४. उपरोक्त ऑनलाईन परीक्षेच्या पूर्वतयारी करीता दि. ०५.०८.२०२१ ते ०९.०८.२०२१ या कालावधीत 'Mock Test' घेण्यात येईल.

१५. परीक्षेनंतर विद्यापीठाद्वारे विद्यार्थ्यांना उत्तर सुची (Answer key) पुरविल्या जाणार नाही तसेच पुनःर्मूल्यांकन केले जाणार नाही.

१६. विद्यार्थ्यांना परीक्षा प्रक्रियेसंदर्भात अडचण उद्भवल्यास विद्यार्थ्यांने संबंधित महाविद्यालयास संपर्क साधावा.

१७. परीक्षा देण्याकरीताची Link, user Id व Password विद्यार्थ्यांना ०२ ऑगस्ट २०२१ नंतर उपलब्ध करुन दिल्या जाईल.

उपरोक्त मार्गदर्शक सुचनेनुसार लेखी परीक्षा घेण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

३१/७/२०२१

(डॉ. अनिल चिताडे)
संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ.
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलीपी :-**

१. मा. कुलगुरु यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, माहितीस सविनय सादर.
२. मा. कुलसचिव कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, माहितीस सविनय सादर
३. मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, माहितीस सविनय सादर
४. उपकुलसचिव (परीक्षा पूर्व/उपरांत), परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग, माहिती तथा कार्यवाहीस सादर.